महाराष्ट्र जनशक्ती

**ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १९९ वे | दिनांक : १३/०७/२०२६ | वार : सोमवार

## फडणवीस केंद्रीय नेतृत्वासाठी योग्य : संजय राऊत



**मुंबई** : देवेंद्र फडणवीस केंद्रीय स्तरासाठी अतिशय योग्य नेतृत्व आहेत. महाराष्ट्र त्यांच्या हातात राहिलेला नाही, महाराष्ट्रात गुंडाचे राज्य आले आहे. आम्ही तर म्हणू की २०२९ पूर्वी त्यांनी पंतप्रधानपद मिळवावे. जर एकनाथ शिंदेंनी भाजपमध्ये आपला गट विलीन केला आणि म्हणाले की मीच भाजप स्थापन केला आणि देवेंद्र फडणवीस आणि बावनकुळे, नरेंद्र मोदी आणि अमित शहा माझे कार्यकर्ते होते तर त्यांना मुख्यमंत्रीपद मिळू शकेल पण बाहेर राहून त्यांना हे पद मिळणार नाही, असा टोला ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी लगावला आहे.

संजय राऊत म्हणाले की, एकनाथ शिंदे हे पुन्हा राज्याचे मुख्यमंत्री होणार नाहीत. शिवसेना फोडण्यासाठी त्यांचा वापर करण्यात आला. मराठी स्वाभिमानी शिवसेना फोडली म्हणून त्यांना मुख्यमंत्री केले होते. आता त्यांचे काम संपले आहे, त्यांच्या कार्याचा अहवाल त्यांनी काल सादर केला आहे. पण आता त्यांना पुन्हा मुख्यमंत्री करणार नाही. केंद्रात जर बदल झाले आणि पंतप्रधान मोदींना वाटले की देवेंद्र फडणवीस एखाद्या प्रमुख खात्याचे नेतृत्व करण्यासाठी योग्य आहेत विभागासाठी योग्य आहेत. त्यांना अर्थखाते किंवा अन्य महत्त्वाचे खाते मिळाले तर महाराष्ट्रात भाजपचाच मुख्यमंत्री होईल. भाजपचे लोकं बाहेरचा मुख्यमंत्री का करतील? त्यांची तशी परंपरा नाही. एकदा त्यांनी शिंदेंना हे पद दिले ते पण पक्ष फोडण्यासाठी.

संजय राऊत म्हणाले की, भाजपचे लोकं मृत गोमातेच्या टाळूवरचे लोणी खातात. १०० कोटी रुपयांच्यावर मृत गायींवर घेतलेले अनुदान हा गंभीर विषय आहे. सरसंघचालक भागवत, पंतप्रधान नरेंद्र मोदी काय करत आहेत? हिंदुत्वाच्या नावाने लुट सुरू आहे. या सर्व गोशाळेची नावे श्रीराम आणि श्री कृष्णाच्या नावाने आहेत. माझ्याकडे संपूर्ण यादी आहे. हे कोणत्या प्रकारचे हिंदूराष्ट्र आहे? असे हिंदूराष्ट्र आम्हाला नको, असे राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत म्हणाले की, महाराष्ट्रात मराठीचीच सक्ती अशी विधाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जोरात केली आहेत. जर महाराष्ट्रात मराठीची सक्ती असेल तर मुंबईमध्ये मराठीत बोला असे सांगणाऱ्या मराठी माणसांना त्रास का होत आहे? याचे उत्तर राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिले पाहिजे. जर त्यांचा मराठी आत्मा आणि स्वाभिमान जिवंत असेल तर.

## आमिरवर राणेंचा 'लव्ह जिहाद' आरोप



**मुंबई** : नीतेश राणे म्हणाले की, पश्चिम बंगालमध्ये जी बाबरी मशिद बनते आहे त्यामध्ये सुद्धा मोठ्या प्रमाणात दान पेट्याच्या संदर्भातील एक मोठा घोटाळा घडला त्यासंदर्भात बोलण्याची कोणीही हिंमत केली नाही. फक्त हिंदू धर्माला बदनाम करण्याची मस्ती हे लोकं दाखवतात. कधीतरी इमाम आणि मौलवीसमोर बोलण्याची हिंमत उद्धव ठाकरे यांच्या गटाने दाखवावी.

शेतकरी कर्जमाफी संदर्भात अतिशय महत्त्वाची अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.ज्या जाचक अटी होत्या, ज्यामुळे शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळवण्यासाठी अडचणी येत होत्या. त्या आमच्या देवाभाऊंच्या सरकारने दूर केल्या आहे. काही नेत्यांनी स्वत:ला शेतकरी नेते, महर्षी म्हणून घेत आयुष्य घालवले त्यांना जे जमले नाही ते देवाभाऊंनी राज्याचे मुख्यमंत्री म्हणून करुण दाखवले आहे. आज शेतकऱ्यांचा खरा तारणहार देवेंद्र फडणवीस आहे हे त्यांतून दिसून येते.

नीतेश राणे म्हणाले की, संजय राऊत यांच्या पक्षाचे नेते आता सरपंच सुद्धा होऊ शकत नाही अशी चिन्ह दिसत आहे.त्यांच्या पक्षात एकही पदाधिकारी, आमदार, खासदार राहायला तयार नाही. राऊत काड्या लावण्याशिवाय दुसरे काही करू शकत नाही. त्यांनी ठाकरे कुटुंब आणि मातोश्रीमध्ये काड्या लावल्या आणि आता ते भाजपमध्ये काड्या लावत आहेत. आम्ही राष्ट्रप्रथम म्हणून काम करणारे लोकं आहोत आम्हाला पद महत्वाचे मानत नाही. पण हे राऊत यांनी लक्षात येणार नाही. या वर्षी पावसाची परिस्थिती तशी गंभीर आहे. साई बाबांनी देवेंद्र फडणवीस यांच्या मागे उभे राहत त्यांना आशीर्वाद द्यावे अशी प्रार्थना मी केली आहे.

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ जुलै २०२६

# बालसदनात 'बालपंख' बालकविता संग्रहाचे प्रकाशन




**बालसदनातील अनाथ मुलांच्या हस्ते वैशाली कंकाळ-चव्हाण, लिखित बालपंख बालकविता संग्रहाचे प्रकाशन**

जिल्हा परिषद शिक्षिका , साहित्यिक कवयित्री वैशाली कंकाळ यांनी परंपरागत चालत आलेल्या साहित्य कृतीच्या प्रकाशन सोहळ्याला छेद देत बालकांचे बालकांसाठी असलेल्या बालपंख कविता संग्रहाचे प्रकाशन लायन्स क्लब बाल सदनाच्या अनाथ मुलांना सन्मान देत त्यांच्या हस्ते केले यावेळी निरागस मुलांच्या चेहऱ्या वरील आनंद अनमोल ठरला याची नोंद साहित्य जगतात होत आहे. वैशाली कंकाळ यांच्या मुलाच्या वाढदिवसाचे औचित्य साधत त्यांनी लायन्स क्लब छत्रपती संभाजीनगर येथे सायंकाळी पुस्तकाचे प्रकाशन केले , कुठलाही बडेजावपणा न करता मुलांनी त्यातील कविता वाचून भाष्य केले मुलांना बाल कविता संग्रह खूप आवडला त्यातील भाव विश्व स्वतःचेच भासले, आई-वडील नसलेला मुलांना प्रेमाची ऊब, पुस्तकाशी नाळ जोडली तर विश्वास निर्माण होईल यामुळे कवयित्री वैशाली कंकाळ यांनी वाचनाची इतर पुस्तके आणि डिक्शनरी भेट दिली वाढदिवसा निमित्ताने सर्वांना मिष्टान्न भोजन देण्यात आले. प्रसिद्ध साहित्यिक सुनंदा गोरे यांची प्रस्तावना, साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड यांची पाठराखण या पुस्तकाला लाभली आहे संपूर्ण पुस्तक रंगीत चित्रमय आहे यात वय ६ ते १४ वयोगटातील मुलांच्या भाव विश्वातील कविता विषय कवयित्रीने मांडले आहेत ज्या मुलांसाठी काव्यलेखन केले त्या मुलांपर्यंत पोहोचणे यासाठीच त्यांनी बाल पंखचा प्रकाशन सोहळा हा बालसदनात घेतला संग्रहात सेल्फी, डोरेमॉन शाळा चॉकलेट ची इत्यादी मुलांना आवडणारे विषय आहेत याप्रंगी अध्यक्ष यांनी एकटा कविता वाचन व त्यावर चर्चा केली गेम नको, नको मोबाईलखेळ कोणते नको आता जगण्याचे गाणे करण्या आनंदाचे नाते हवे आताउद्याचे साहित्यिक, साहित्यबीज रोवण्याचा हा सोहळा अविस्मरणीय, व कौतुकास्पद ठरला. सोहळ्या साठी साहित्यिका माजी अध्यक्ष माधुरी चौधरी, सुहास चव्हाण अध्यक्ष मयूर जालनावाला, मनोहर कंकाळ सुरेखा कंकाळ सचिव दीपक भारदिया डॉ. महेंद्र चौधरी, ओजस्वी चव्हाण , देवर्ष चव्हाण व बालसदनाची मुले उपस्थित होते.शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर मॅडम, डॉ. दादा गोरे, डॉ विशाल तायडे, डॉ विनोद शिनकर, आशा डांगे अनेक नामवंत साहित्यिक, शिक्षकानी विधायक सोहळ्याचे अभिनंदन केले.

## छावाचे प्रा.प्रदीप साळुंखे यांना केला अय्युब पठाण यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** छावा संघटनेचे कक्ष प्रमुख तथा समितीचे आणि वक्ता प्रशिक्षण विभाग कक्ष छत्रपती संभाजीनगरचे प्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक प्रदीप सोळुंके यांनी ईटखेडा संभाजीनगर येथे नुकतेच प्रसिद्ध साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांचा शाल व श्रीफळ आणि पुस्तक भेट देऊन यथोचित सत्कार केला आहे. याप्रसंगी मराठा युवा कृती समितीचे संस्थापक तथा महाराष्ट्राचे अध्यक्ष प्राध्यापक चंद्रकांत भराट आणि अंजान एन. पाटील यांची या सत्काराच्या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. याप्रसंगी प्रा. प्रदीप साळुंखे यांनी सांगितले की, "अय्युब पठाण यांच्यासारख्या संघर्षमय जीवन जगणाऱ्या असे बँडमास्टर ते शाळा मास्तर असा प्रवास करणारे आणि आता मराठी साहित्यिक म्हणून प्रसिद्ध असलेले व्यक्तिमत्व म्हणजेच अय्युब पठाण लोहगावकर होय." बालभारतीच्या इयत्ता चौथीच्या पाठयपुस्तकामध्ये मराठी माध्यमात त्यांची, " कौतुकाची थाप " या पाठाचा अभ्यासक्रमात संपूर्ण महाराष्ट्राच्या प्राथमिक शाळेमध्ये समावेश झालेला असून तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद ) यांच्याही अभ्यास मंडळाने बी.ए. तृतीय वर्षाच्या सत्र क्रमांक सहावे यामध्ये "गंध फुलांचा" या कवितेचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश केल्याने अय्युब पठाण यांचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन दिले आहे. याप्रसंगी बिडकीन येथील नागरिक व युवावर्ग मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## विख्यात कवी/ समीक्षक डी.बी.जगत्पुरिया यांचे प्रतिपादन.





**कन्नड :** 'नानाई फिल्मस् प्रॉडक्शन' चे लेखक/दिग्दर्शक व सिनेअभिनेता प्रविणकुमार अहिरे हे आचार,विचारांचा समन्वय घडवीत प्रभावी दिर्घलघूपट निर्माण करतील ही खात्री आहे. असे विचार विख्यात समीक्षक व विचारवंत डी.बी.जगत्पुरीया यांनी कन्नड शिक्षक सभागृहात नानाई फिल्मस् प्रॉडक्शन च्या ऑडीशन कार्यक्रमात व्यासपीठावरुन बोलतांना व्यक्त केले.निर्माती सौ.अर्चना प्रविणकुमार अहिरे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत काल "कोयताबंद" व "हुंदका - द व्हायरस" अशा दोन दिर्घलघुपटांसाठी अभिनय चाचणी घेण्यात आली.या कार्यक्रमाचे उद्घाटन मराठी,हिंदी चित्रपट व टी.व्ही.स्टार सुप्रसिद्ध सिनेअभिनेते सुनील गोडबोले यांच्या शुभहस्ते करण्यात आले.मंचावर महाराष्ट् राज्य शिक्षक व शिक्षकेतर सेनेचे राज्य समन्वयंक दिपकदादा पवार,लोकशाहीर सि.के. मिस्तरी सर अभिनेत्री अनुपमाताई पाटील,लेखक बशिरमियाँ देगलूरकर,पत्रकार संघटनेचे विठ्ठल शिरसे यांची विशेष उपस्थिती होती. तर नागद गटाचे जिल्हा परिषद सदस्य दिलीपसिंग राजपुत, डॉ.सौ.प्रीती राजपुत व जेष्ठ पत्रकार राजेंद्र सुरडकर यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक करत शुभेच्छा दिल्यात. महाराष्ट्रभरातुन बहुसंख्य कलाकार ऑडीशनला हजर होते.उसतोड कामगारांची व्यथा व त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर होणार्या परिणामांची ज्वलंत कथा मांडणारा "कोयताबंद" आणी कोरोनाग्रस्त वाटसरुंची करुण कहानीचे विदारक सत्य सांगणारा "हुंदका - द व्हायरस" दिर्घलघुपटांचे लवकरच ग्रामीण भागातुन चित्रिकरण सुरु होणार असल्याचे नानाई फिल्मस् प्रॉडक्शनचे प्रविणकुमार अहिरे व सौ.अर्चना अहिरे यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ जुलै २०२६


## झाडे लावू

झाडे लावू
झाडे जगवू
पर्यावरणाला
आपण वाचवू

उंच बहरतील
हिरवी झाडे
खळखळ वाहती
नदी नि ओढे

फुलती डोंगर
फुलती मळे
भुकेले पक्षी
चाखतील फळे

वृक्ष सखा
वृक्ष माऊली
उन्हात देतो
शितल सावळी

निसर्गाचा
जपूया ठेवा
शुद्धहवेचा
मिळेल मेवा

झाडे लावू
झाडे जगवू
मनामनात
संदेश रुजवू




**रवींद्र व्ही. चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


## विठ्ठलाच्या भेटीसाठी

वारी चालली चालली
पांडुरंगाच्या रे दारी
वारी पाहून अवाक्
झाली दुनिया ही सारी.

वारकरी झाले गोळा
माथी लावून चंदन
हरी मुखे हरी मुखे
सदा करती वंदन.

विठू नामाच्या तालात
टाळ मृदंग वाजती
वारकरी आनंदाने
वाट पंढरी चालती.

हरी नामाचा गजर
करे भक्तगण सारे
आता सर्वत्र वाहते
जगी भक्तीचेच वारे.

विठ्ठलाच्या भेटीसाठी
वाट चाले वारकरी
विठ्ठलाच्या दरबारी
नाही कोणी धारकरी.




**नागेश बोंतेवाड**
छत्रपती संभाजीनगर


# स्वराज शिंदेचे भारत टॅलेंट सर्च (BTS) परीक्षेमध्ये यश...



राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार जीवना भिमुख शिक्षण देणारे पहिले पाऊल या व्यापक दृष्टिकोनातून एज्यूमीट अकॅडमीने (महाराष्ट्र) आयोजित केलेल्या 'भारत टॅलेंट सर्च' (BTS) परीक्षेत द देशमुख इंटरनॅशनल स्कूलचा विद्यार्थी स्वराज जिजा शिंदेने पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा सातारा (खंडोबा) केंद्रातून इ. सहावी वर्गामधून सर्व तृतीय क्रमांक मिळवला असून राज्य गुणवत्ता यादीत १३२ वा क्रमांक मिळवत त्याने यश संपादन केले आहे.

छत्रपती संभाजी नगर तालुका स्तरीय पारितोषिक वितरण समारंभ जिल्हा परिषद केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा सातारा (खंडोबा) येथे संपन्न झाला.

या प्रसंगी ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीराम केदार, केंद्रप्रमुख मुख्याध्यापक रमेश परदेशी, केंद्र प्रमुख गजानन नेहाले ,केंद्रप्रमुख भरत संत, राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त नारायण मंगलारम, BTS राज्य मार्गदर्शक ज्ञानदेव नवसरे राज्य शिक्षक पुरस्कार प्राप्त संजय खाडे, मीनाक्षी राऊत, अरुण राठोड, बाबासाहेब मंदाडे, भरत काळे, अनिल गोरडे, वैशाली वाघ, वैशाली साबदे यांच्या हस्ते स्वराज शिंदेला स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्र व ग्रंथ भेट देवून त्याचा सत्कार करण्यात आला.

यापूर्वी स्वराज शिंदेने डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक कॉम्पिटिशन, आय. एम. ओ. ,आय. ई. ओ., एन. एस.ओ. या ऑलंपियाड परीक्षेतही गोल्ड मेडल आणि सिल्वर मेडल मिळाले आहे.

या यशाबद्दल देशमुख इंटर नॅशनल स्कूलचे संचालक प्रा.दीपक देशमुख, मुख्याध्यापक प्रज्ञा देशमुख, राजश्री नेमाडे, हेमंत नेमाडे, सुरेखा शिंदे,आर्यन शिंदे डॉ.जिजा शिंदे यांनी अभिनंदन केले आहे.

# तडवी यांची IHRP&DO समन्वयकपदी नियुक्ती



**जळगाव (शेख शरीफ) :** सामाजिक न्याय, मानवी हक्क आणि शांततेच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय मानवाधिकार शांतता विकास संघटना (IHRPDO) ने हमीद इस्माईल तडवी यांची महाराष्ट्र राज्य माध्यम समन्वयक म्हणून अधिकृत नियुक्ती केली आहे. संघटनेकडून त्यांना अधिकृत ओळखपत्र (ID) प्रदान करण्यात आले असून, राज्यभर संघटनेच्या माध्यम समन्वयाची महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातील मानवाधिकार, सामाजिक न्याय, शांतता आणि जनजागृती विषयक उपक्रमांना अधिक प्रभावीपणे प्रसिद्धी मिळणार असून, संघटनेच्या कार्याचा विस्तार करण्यास मदत होणार आहे. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार शांतता विकास संघटना (IHRPDO) ही "मानवता, शांती, न्याय आणि समानता" या ध्येयवाक्याने कार्यरत असून, देशभरात मानवी हक्कांचे संरक्षण, सामाजिक सलोखा, शांतता प्रस्थापित करणे आणि वंचित घटकांच्या न्यायासाठी विविध उपक्रम राबवत आहे.हमीद इस्माईल तडवी यांच्या नियुक्तीबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद

8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १३ जुलै २०२६


## वारी

# विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म भेदाभेद भ्रम अमंगळ

वारीची परंपरा जगाला आदर्शवत, सर्व जाती धर्माचे लोक वारीत सहभागी होतात. वारीत कीर्तन, प्रवचन, भारुड, भजन या माध्यमातून वारकऱ्यांचे प्रबोधन सुरू असते. त्यातून समाज प्रबोधन सुद्धा होते. वारीमध्ये सर्व प्रकारचे लोक असतात. वारीमध्ये वारकऱ्याला विठ्ठल रुक्माई म्हणजेच माऊलीच्या भेटीची आस असते. विठ्ठल रुक्माई दोघेही कमरेवर हात ठेवून विटेवर उभे असतात. इथे कोणीही लहान मोठा नाही. स्त्री पुरुष समानतेचा संदेश देणारी ही प्रतिमा अहिंसेचाही पुरस्कर्ता असल्याचे आपल्याला दिसून येते. विठ्ठल रुक्माई दोघेही कोणत्याही प्रकारची शस्त्र बाळगत नाहीत. वारीत कर्मकांड करत नाही, धर्मनिरपेक्ष, भाषा निरपेक्ष, गरीब-श्रीमंत, लहान-मोठा हा कोणताही भेदभाव न करता वारीमध्ये सर्व एकमेकांना माऊली म्हणत एकमेकांचा नमस्कार करतात. हा नमस्कार या व्यक्तीला नसून त्याच्यामध्ये असणाऱ्या देवत्वाला असतो. जप तप कर्म क्रिया नेम धर्म । सर्वांघटीं राम भावशुद्ध॥ कोणत्याही कर्मकांडात न अडकता मन शुद्ध करण्यासाठी आपल्यातील विकारांवर विजय मिळवण्यासाठीच वारकरी वारीला येतो. त्याच्या साठी ईश्वर हा प्रत्येक ठिकाणी म्हणजे चराचरात भरला आहे. वारी म्हणजे शुद्धता, निर्मळता. वारी म्हणजे आपल्या कामातील प्रामाणिकपणा, कामावरील निष्ठा, वारी म्हणजे ज्ञान, वारी म्हणजे स्वतःच्या कामातील तत्परता, वारी म्हणजे स्वतःमधील अप्रमाणिकपणाला तिलांजली, वारी म्हणजे निवडलेल्या कामाला वाहून घेण्याची तयारी, वारी म्हणजे आपले कर्म, वारी म्हणजे आपला अभ्यास, वारी म्हणजे जीवनाचे सार, वारी म्हणजे आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करून ते मिळवण्यासाठी कष्ट करण्याची तयारी, वारी म्हणजे उद्दिष्टाकडे झेप, वारी म्हणजे जागृती, वारी म्हणजे विज्ञान, वारी म्हणजे संकल्प, वारी म्हणजे ध्येयाचा पाठलाग, वारी म्हणजे माणसं जोडण्याची प्रक्रिया, वारी म्हणजे चॅलेंज स्वीकारण्याची प्रक्रिया, वारी म्हणजे स्वतःला ओळखण्याची प्रक्रिया, वारी म्हणजे दुसऱ्यांसाठी चांगले करण्याची प्रेरणा, वारी म्हणजे संकटांना न घाबरण्याची प्रक्रिया, वारी म्हणजे चिकित्सात्मक प्रेरक दृष्टिकोन, वारी म्हणजे उत्तम शरीर संपदा मिळवण्यासाठी करावी लागणारी कसरत, वारी म्हणजे नियमित प्राणायाम-योग करण्याची साधना.

ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस ॥ ग्यानबा-तुकोबांनी महाराष्ट्रात ही वारीची संस्कृती जपली वाढवली. वारीच्या मुळाशी आपल्याला गावातील शेतकरी व इतर सर्व समाजवर्ग दिसतो. पावसाळा सुरू होण्याआधी शेतकरी नांगरणी, कोळपणी करून पाऊस पडल्यानंतर पेरणी करतो. पेरणी झाल्यानंतर पुढे काही काळ त्याच्या हातात थोडा वेळ असतो. या कालखंडात हा शेतकरी व त्याला सहाय्यभूत समाज वर्ग वारीला जातात. वारीहून परत येईपर्यंत पेरणी फलित झालेली असते. पुढे तीन-चार महिने कष्ट करण्याची ऊर्जा त्याने वारीतून मिळवलेली असते. दसरा दिवाळीच्या दरम्यान आलेलं पीक विकून हातात दोन पैसे आलेले असतात. अशावेळी तो सण साजरे करून कार्तिकी वारीला प्रस्थान करतो व पुढील कार्यासाठी ऊर्जा मिळवतो. वारकरी सृष्टीच्या कल्याणाची मागणी पांडुरंगाकडे करतो. उत्तम पाऊस पडू दे, शेतात धनधान्य पिकू दे व सर्वांच्या पोटात अन्न जाऊ दे अशी साधी मागणी तो पांडुरंगाकडे करतो. इतर सर्व समाज घटकांबरोबरच शालेय जीवनाचेही असेच असते. जूनच्या मध्यावर्ती शाळा सुरू होतात. मुलं अभ्यासाला लागतात आणि लागलीच शाळा शाळांमध्ये शालेय पातळीवर वारीचे आयोजन केले जाते. शाळा शाळांमध्ये पालखीतील विठ्ठल रुक्माई चे पूजन केले जाते. ते स्थानिक परिसरात पालखी सहित दिंडी काढतात. या दिंडीत विद्यार्थी व विद्यार्थिनी वारकऱ्यांचा गणवेश घालत भजन, अभंगासह टाळ मृदुंगाच्या तालात विविध खेळ खेळतात. त्यात रिंगण, फुगड्या, लेझीम यांचा समावेश असतो. यावर्षी या दिंडीच्या माध्यमातून 'उल्लास नवभारत साक्षरता अभियानाचा प्रचार प्रसार' करण्यात आला. या दिंडीतून विद्यार्थ्यांना भरपूर आनंद व ऊर्जा मिळते. पुढील तीन-चार महिने म्हणजेच पहिली चाचणी व सहामाही परीक्षेपर्यंत ही ऊर्जा टिकून राहते. त्यानंतर दिवाळीची सुट्टी नंतर सुरु होणारे शाळेत कार्तिकी वारीचे वारे आषाढी प्रमाणेच वाहू लागतात. त्यातून मिळालेली ऊर्जा त्यांना वार्षिक परीक्षेपर्यंत कामात येते. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेदभ्रम अमंगळ ॥ आपल्या हजारो वर्षाच्या संत परंपरेने सांगितले आहे. संपूर्ण जग हे विष्णुमय आहे. यात कोणत्याही प्रकारचा भेदाभेद करणे अमंगळ आहे.

संत श्रेष्ठ तुकाराम महाराज म्हणतात. "वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे" म्हणजेच ईश्वर वारीतील प्रत्येकाला वृक्ष, वेली, पशु, पक्षी, चराचरात दिसतो. तेव्हा त्या सर्वांची जपवणूक करणे आपले आद्य कर्तव्य आणि यातच आपले हित आहे. वारीच्या इतिहासाचा विचार करता वारीने केलेले कार्य हे त्याच्या अलौकिकत्वाला शोभावे असेच आहे. या देशा वर झालेल्या परकीय आक्रमणांचा व त्यामुळे येणाऱ्या गुलामगिरीच्या जाच्यात समाज भरडला जात असताना त्यांच्यात भारतीय संस्कृती, सभ्यता, तिचा अभिमान, स्वाभिमान टिकवून ठेवण्याची मोठी कामगिरी पार पाडली. यातूनच छत्रपती शिवरायांना स्वराज्य स्थापनेसाठी मावळे मिळालेत. स्वातंत्र्याचे हे बीजारोपण जे वारकऱ्यांनी केले ते आपल्याला विविध रूपात प्रकट होताना दिसते. काळाच्या गरजेनुसार वारकरी कधी धारकरी झालेत तर कधी सत्याग्रही झालेत. यातूनच आपल्याला सर्वांना हजारो वर्षापासूनच्या गुलामगिरीतून मुक्ततेचा १५ ऑगस्ट १९४७ रोजी सूर्योदय बघता आला. धन्यवाद.


**लेखक**

**श्री. प्रशांत पुंडलिक शिरुडेके**

रा. कोतकर

माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय डोंबिवली.

९९६७८१७८७६

prashantshirude१६७४@gmail.com


# माळीवाड्यात अवाना भक्तीवारीचे जल्लोषात स्वागत



**दौलताबाद (जावेद अहमद)** माळीवाडा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर, दि. १२ जुलै अवाना भक्तीवारी (भक्ती फेरी दिंडी)चे माळीवाडा येथील सावता महाराज मंदिरात रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. टाळ - मृदंगाच्या गजरात "ज्ञानोबा - तुकाराम", "एकनाथ - नामदेव" यांच्या जयघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. महिलांनी फुगड्या खेळत भक्तीचा आनंद व्यक्त केला. स्वागतानंतर भक्ती फेरीने पुढील प्रवासासाठी प्रस्थान केले. भक्ती वारीची पुजन शिवाजी आस्वार अभय विखनकर यानी केले यावेळी अभय विखनकर यांनी उपस्थितांना अवाना भक्तीवारीची संकल्पना आणि उद्दिष्टे समजावून सांगितली. तसेच माळीवाड्याचे तलाठी असाराम हेकडे (आप्पा) यांनी भक्ती फेरीला शुभेच्छा देत हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.अवाना भक्तीवारी ही केवळ धार्मिक यात्रा नसून शेतकरी जनजागृती, जलसंवर्धन, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बांधिलकी यांचा संदेश देणारा अनोखा उपक्रम आहे. "शेतकरी हा केवळ जगाचा पोशिंदा नसून भक्तीचाही मोठा आधार आहे," या भावनेतून शेतकऱ्यांच्या इच्छा, सुख-दु:ख आणि शेतीच्या प्रगतीची आस श्री विठ्ठलाच्या चरणी अर्पण करण्याचा संदेश या वारीतून दिला जात आहे.एम्बी इंडस्ट्रीज लिमिटेडच्या 'अवाना' या कृषी ब्रँडतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या अभियानाची संकल्पना मकरंद अप्लवार व रिंकू अप्लवार यांनी मांडली असून, यंदाचे हे दुसरे वर्ष आहे. मैथली अप्लवार यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर ही भक्तीवारी आयोजित करण्यात आली आहे अभियानांतर्गत दोन विशेष भक्ती वारी रथ महाराष्ट्रभर प्रवास करत आहे.या अभियानातील एक रथ नाशिक येथून मार्गस्थ झाला असून तो पुणे, अहिल्यानगर, बारामती, सातारा सांगली मार्गे पंढरपूर येथे पोहचतेमाळीवाडा येथे झालेल्या स्वागत सोहळ्यास असाराम हेकडे तलाठी आप्पा,पोलिस पाटील प्रमोद साठे, मनेश गाजरे, नंदू मूळे, कडू किर्तीकर, सुधाकर हेकडे, गणेश आस्वार, आण्णा जाधव, जगन्नाथ भगत, नामदेव धनायत, रमेश साठे यांच्यासह महिला व ग्रामस्थ आणि वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




